
3090

## शकुंतला फडणीस

# खमंग धडा

3090



BVBK-0403010

वाचनालय
बा. वा.
३०७०
७।११।७४

# खमंग धडा

म. ग्रं. सं. ठाणें, वाङ्मय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र 3070 दिनांक ७।११।७४
विषय बा. वा. क्र........

शकुंतला फडणीस

BVBK-0403010

दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ३०.

**खमंग धडा**

■

प्रकाशक - श्री. राजीव दत्तात्रय बर्वे,
मॅनेजिंग डायरेक्टर
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ३०

■

© सौ. शकुंतला फडणीस
१२३३ शुक्रवार, सुभाषनगर, पुणे २

■

प्रकाशन दिनांक - २५ ऑगस्ट १९९४
प्रकाशन क्रमांक - ६८१
ISBN - 81 - 7294 - 100 - 5

■

मुद्रक - श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ, पुणे ३०

■

अक्षरजुळणी
ला प्रिंट
१०२५/ब, सदाशिव पेठ,
पुणे - ३०

■

मुखपृष्ठ - श्री. दीपक संकपाळ

■

मूल्य : रुपये बारा मात्र

16 ऑगस्ट AUG 1995

चि. धवल आणि चि. चिन्मय

– यांस सप्रेम –

तुमच्यासारख्या खोडकर दोस्तांच्या गोष्टी

तुम्हालाच !

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १) खमंग धडा | ५ |
| २) शुक शुक हॅंड | १० |
| ३) शोधा म्हणजे | १५ |
| ४) प्रसिद्धीच प्रसिद्धी | २० |
| ५) माठ आणि माठ | २५ |
| ६) खास बक्षीस | ३१ |

# खमंग धडा

त्या दिवशी शाळा अचानक लवकर सुटली. मग काय, सगळी मुलं आनंदानं 'होऽऽ' करून ओरडली. उड्या मारू लागली. सगळ्यांनाच घरी जायची घाई होती. बबलूला तर खूपच ! कारण त्याची आई दुपारी मस्त खाऊ तयार करणार होती. बबलूचे आवडते गुलाबजाम ! घरात खवासुद्धा आणला होता. त्यामुळे गुलाबजाम किंवा कमीतकमी खव्या-रव्याचे लाडू तरी नक्कीच होणार होते. आवडत्या खाऊच्या विचारात, आनंदाच्या भरात, बबलू घरी आला. पण कसलं काय ? घराला कुलूप ! तो एकदम हिरमुसला. पण नंतर वाटलं, आईनं गुलाबजाम करून ठेवले असतील अन् नंतरच ती गप्पा मारायला मैत्रिणीकडे किंवा मावशीकडे गेली असेल !

मग बबलूनं शेजारच्या काकूंकडून किल्ली घेतली अन् कुलूप काढून तो घरात शिरला. गडबडीनं बूटमोजे काढून फेकले, दप्तरही तिथंच टाकलं अन् आधी खाऊचा तपास सुरू केला. सगळी कपाटं शोधली. फळीवरचे डबे उचकून झाले, पण छे ! गुलाबजामचा किंवा लाडूचा कुठं मागमूसही नव्हता. फार काय, घरात वेलचीचा वास येत नव्हता. बादलीत नारळाच्या शेंड्याकरवंट्या नव्हत्या की झारा - कढईसुद्धा घासायला पडली नव्हती ! हुं ! म्हणजे आईनं गुलाबजाम किंवा लाडू केलेच नव्हते तर !

मग आता खायचं काय ? नाही - म्हणजे तसा शाळेत डबा

खाऊन झाला होता. आणि नेहमीच्या वेळेप्रमाणे तो जवळजवळ दीड तास लवकर आला होता. म्हणून काय झालं ? घर दिसलं की भूक नाही लागत वाटतं ? पण आता खाणंही तयार नाही, अन् आईदेखील घरात नाही. काय बरं करावं आता ? बबलू डोकं खाजवू लागला. अरे हो ! आठवलं. काल की परवाच त्या निळ्या पत्र्याच्या डब्यात बाकरवड्या होत्या.

बबलूनं घाईघाईनं निळा डबा उघडला. छे ! त्यात तर कसलं तरी पीठ होतं. मग त्याला वाटलं निळ्या नाही, पिवळ्या डब्यात मक्याचा चिवडा होता. मग त्यानं पिवळा डबा शोधला. पण त्यातसुद्धा चिवडाबिवडा इल्ला ! कसली तरी डाळ भरून ठेवली होती. छे ! वैताग नुसता !

बबलूनं आणखी काही डब्यांची उचकपाचक केली. कुठं शेंगदाणे, गूळ, खोबरं, असं काहीबाही तोंडात टाकलं. त्याला असं खूप छान छान अन् पोटभर खायला हवं होतं. आणि आईनं तर काहीसुद्धा करून ठेवलं नव्हतं. आता मात्र बबलूला राग येऊ लागला. पाय आपटत तो स्वतःशी बडबडू लागला. बाहेर जायचं तर आईनं निदान चिठ्ठी तरी नको का लिहून ठेवायला ? 'अमुक अमुक करून जाळीच्या कपाटात अमक्या अमक्या डब्यात ठेवलंय ते खायला घेणे' - छे ! काही नाही ! साधी केळीसुद्धा नाहीत घरात !

मग त्यानं विचार केला, आई न का करून ठेवेना ! आपण स्वतः करून घेऊ ! आम्हाला काय हात नाहीत का ? शेजारची मिनी माझ्या एवढीच तर आहे. तिला कित्ती काय काय करता येतं. आणि तो नंदू ? बाप रे. त्याला तर थालीपीठ अन् साबुदाण्याची खिचडीसुद्धा करता येते. तो काय ? सारखाच स्वैपाकघरात लुडबुडत असतो. म्हणे आईला मदत ! हॅ ! आपल्याला नाही बाबा आवडत असलं काही ! मिनी मुलगी आहे. तिला करू दे. मी फक्त आजच्या दिवस करणार ! काहीतरी मस्त खमंग बनवून घेणार.

काय बरं करावं ? बटाटेवडे ? छे ! ते कसे करतात इथं कुणाला माहीत ? मग-कांद्याची भजी ? नको. तळताना गरम तेल हातावर उडलं म्हणजे ? शिरा ? तोही नको. बराच विचार करून बबलूनं कांदेपोहे करायचे ठरवले. कारण त्याला समोरच्या शिंकाळ्यात चिक्कार कांदे दिसत होते. अन् मघाशी डबे उचकटताना त्याला पोहेपण सापडले होते. त्यामुळे कांदेपोहे करायचे असं बबलूनं ठरवून टाकलं. एकदम सोप्पा अन् मस्त पदार्थ.

मग त्यानं खसाखसा कांदे चिरायला सुरवात केली. त्याबरोबर डोळ्यांतून हेऽऽ पाणी येऊ लागलं. बबलू डोळे पुसू लागला. पण



कांद्याच्याच हातांनी डोळे पुसल्यामुळे आणखीनच आग व्हायला लागली अन् पहिल्यापेक्षा जास्तच पाणी येऊ लागलं. मग रुमालानं डोळे पुसत, नाकानं सूं सूं करत तो कांदे सोलू लागला. डोळ्यांना धड दिसतसुद्धा नव्हतं तरी तो तसेच कांदे चिरू लागला. काही लहान, काही मोठे, वाकडे तिकडे असे कांदे कापत असताना एकदम खसकन् बोटच कापलं ! बाप रे ! कसलं जोरात कापलं. भळभळ रक्त येऊ लागलं.

बबलूनं लगेच बोट नळाखाली धरलं. स्वच्छ धुतलं अन् पटकन त्यावर मसाल्याच्या डब्यातली हळद दडपली. आई ग ! आग आग ! चमचा तिखटाचा होता वाटतं. कसली भयंकर आग व्हायला लागली. मग बबलूनं बोट पुन्हा नळाखाली धरलं. किती वेळानं आग थांबली. जराशानं रक्तही थांबलं.

मग बबलूनं गॅस पेटवला. कढईत तेल ओतलं. लगेचच पाठोपाठ त्यात कांद्याच्या फोडी, मिरच्या, कढीलिंब, पोहे, मीठ सगळं घालून टाकलं अन् झाकण ठेवून दिलं. पोहे पोहे ते काय, दोन दणदणीत वाफा आल्या की पोहे तय्यार. आईचं हे वाक्य आठवतच बबलू दोन वाफा यायची वाट बघू लागला. वाफ लौकर येण्यासाठी त्यानं जाळसुद्धा चांगला मोठ्ठा ठेवून दिला.

आँ ? पण हा जळकट वास कसला बुवा येतोय ? बबलूनं घाईघाईनं पोह्यावरचं झाकणं काढलं. पण काढता काढता ते पडलंच पायावर ! आईऽऽ आई ग ! कसल्या झिणझिण्या आल्या. बोटांवर उभीच्या उभी झाकणी आपटली होती ना. पण तिकडे दुर्लक्ष करून तो पोहे ढवळायला लागला. बापरे ! पोहेच करपले होते. अगदी पार काळे झाले होते ! मग बबलू जोराजोरानं पोहे ढवळू लागला. इतक्या जोरानं की ढवळताना अर्धअधिक पोहे बाहेरच सांडत होते. त्यात पुन्हा झारा तापल्यामुळे हातही भाजत होता अन् पोहे तर आणखीनच जळत होते. आता मात्र बबलूचं डोकं एकदम 'आऊट' झालं. हॅट ! काय म्हणावं तरी काय ? पोहे म्हणे सोपे. साधे. अन् तेसुद्धा धड जमू नयेत आपल्याला ?

बबलूचा अगदी संताप संताप होत होता.

अन् एवढ्यात लोटलेलं दार ढकलून आई घरात आली. आल्या आल्या तिनं आधी गॅस बंद केला. ''बबलू, अरे काय चाललंय तरी काय तुझं ?'' आईनं जरासं रागानंच विचारलं. ''आँ ? या पोह्याचे तर नुसते कोळसे झालेत. केवढा धूर ! कसला जळकट वास सुटलाय. काय गोंधळ घालून ठेवला आहेस अन् वर ओट्यावरही पसारा ! शी !'' आई जाम चिडली होती. ''एवढं आम्ही लौकर घरी यावं तर घराला कुलूप. खायला पण काहीसुद्धा नाही. अन् म्हणाली होतीस, ''गुलाबजाम करणार'' म्हणून !'' बबलू मुसमुसू लागला. मग आईचाही सूर जरा बदलला. ती म्हणाली - ''अरे, मला अचानकच सरितामावशीकडे जावं लागलं. मग मी काय करणार ? पण हे बघ, मावशीनं तुझ्यासाठी काय काय दिलंय. तुझ्या आवडीचे बेसनलाडू आणि चकल्या.''

चकल्या ? बेसनलाडू ? नावं ऐकल्याबरोबरच बबलूचा चेहरा खुलला. अन् तो लाडू-चकल्यांवर ताव मारू लागला. म्हणाला - ''आई, खरंच चकल्या अगदी मस्त झाल्यात नाही ?'' ''मग ? मावशीच्या चकल्या होतातच मस्त. आणि हो ! चकल्या पाडायला तिला छोटू मदत करत होता बरं का !'' आईचं बोलणं ऐकून बबलू क्षणभर थबकला अन् हळूच म्हणाला - ''आई, मला शिकव ना पोहे करायला !''

# शुक शुक हँड

मंजू वर्गात शिरली अन् मोजून एकशेचोवीस डोळे तिच्याकडे रोखून बघू लागले. कोण हे पात्र ? कुठून आलंय हे ध्यान ? अन् इथं आमच्या वर्गात काय हिचं काम ? असल्या गावंढळ मुलीला इथं प्रवेश नाही म्हणावं ! अशा तऱ्हेची स्वगतं मनातल्या मनात सुरू झाली. वर्गातल्या झाडून साऱ्या मुली, अभ्यास टाकून मंजूकडे बघतच बसल्या.

अन् का नाही बघणार ? मंजू मुळी दिसतच होती तशी. वरूडसारख्या खूप दूरच्या अन् लहानशा खेडेगावातून एकदम पुण्यासारख्या मोठ्या शहरात दाखल झालेली मुलगी. वय वर्षे तेरा. चपचपीत तेल लावून घातलेल्या घट्ट दोन वेण्या, डोळ्यात काजळ, हातात काचेच्या बांगड्या - मुख्य म्हणजे भांबावलेला चेहरा अन् भेदरलेली नजर. त्यामुळे ती चक्क बावळट आणि गाववाली वाटत होती.

मंजूच्या बाबांची पुण्याला बदली झाली होती. या पुणे शहराबद्दल मंजूनं खूप काही ऐकलं होतं. त्यामुळे पुण्याला जायचं, तिथं राह्यचं, तिथल्या शाळेत शिकायचं, या कल्पनेनं मंजू नुसती हरखून गेली होती. पण प्रत्यक्ष राह्यला आल्यानंतर मात्र ती एकदम गांगरूनच गेली. तिथली राहणी, तिथल्या मोठाल्या शाळा, तिथली गर्दी, त्या गर्दीतही धडाधड सायकल मारणाऱ्या मुली अन् स्कूटर पळवणाऱ्या बायका बघून मंजू अगदी थक्क होऊन गेली.

तिला वाटलं, ''छे ! इथल्या मुली भलत्याच हुषार दिसताहेत.

यांच्यापुढे आपला काय पाड लागणार ? वरुडला बहुतकरून आपली लंगडी गायच होत असणार. आता मात्र तिथे मिळणारी बक्षिसं अन् कौतुकं विसरायला पाहिजे. इथल्या शाळेत आपला कसा काय टिकाव लागेल कुणास ठाऊक !'' पण थोडेच दिवसांत मंजूची भीड चेपली. अन् मंजू काय एवढी बुद्दू नाहीये - बरी आहे अभ्यासात, अन् मुख्य म्हणजे गाणी एकदम टॉप म्हणते, हे वर्गातल्या शिष्ट ठक्यांना कळलं एकदाचं. मग मात्र त्या मुलींशी मंजूची एकदम मैत्रीच झाली.

आता मैत्री बित्री ठीकाय. पण इथल्या मुलींची एकूण धिटाई बघून मात्र मंजू चकित होत होती. काय तिच्या वर्गातल्या मुली. काय शेजारच्या मुली. अशा फाड् फाड् इंग्लिश बोलायच्या. मुलांबरोबर वाद घालायच्या. क्रिकेट नाही तर व्हॉलीबॉल खेळायच्या. तरुण तरुण मुलीसुद्धा ओळखीच्या पुरुषांबरोबर पटकन् स्कूटरवरून जायच्या. अन् मंजूला मात्र - बाप रे ! बसमधल्या गर्दीतसुद्धा संकोच वाटायचा. नाही तरी वरुडमध्ये सगळं जुनंच वळण होतं. तिथं तर बायकामुली पुरुषांशी जास्त बोलायच्यासुद्धा नाहीत !

नव्या वातावरणात मंजू हळूहळू रुळत होती. अभ्यास जरा जास्त असायचा. पण तो ती मनापासून करायची. अभ्यास करताना मधूनच तोंडानं गाणं गुणगुणायची. तिचा आवाज फार गोड होता. अन् ती गाणंही फार छान म्हणायची. मंजूचे आजोबा, पणजोबा, खापर पणजोबा - सगळेजण कीर्तनकारच होते. त्यामुळे मंजूला गाण्याची जणू उपजतच देणगी होती. ती जाईल तिथं तिला गाण्याचा आग्रह व्हायचा. वर्गातसुद्धा बाई अन् मुली तिला कविता चालीवर म्हणायला सांगायच्या. या नव्या मुलीचं गाण्यामुळे साऱ्या शाळेत कौतुक चाललं होतं.

तशातच आंतरशालेय भक्तिगीत स्पर्धा जाहीर झाली. अन् त्यासाठी शाळेतर्फे बाईंनी मंजूचीच निवड केली. आता हे ऐकून एखादीला केवढा आनंद होईल, नाही का ? पण एवढी आनंदाची बातमी ऐकून मंजूची एकदम तंतरलीच. ''नको ! नको बाई. मी पुढच्या वर्षी

घेईन ना भाग." ती अजीजीनं म्हणाली. तिला स्वत:बद्दल खात्री वाटत नव्हती. पण बाईंनी तर तिचं म्हणणं साफ धुडकावून लावलं. म्हणाल्या, "काही काळजी करू नकोस. अजून दोन महिने अवकाश आहे. जोरात प्रॅक्टिस कर. तू नक्की बक्षीस मिळवशील."

अन् खरोखरच मंजूला बक्षीस मिळालं - पहिल्या क्रमांकाचं ! अर्थात मंजूनं मेहनतही खूपच घेतली होती. तिच्या वडिलांनी तर स्पर्धेच्या तयारीसाठी तिला स्पेशल शिकवणीसुद्धा लावली होती. त्यांना स्वत:ला गाण्याचं अंग होतंच. त्यामुळे तेही तिला चांगल्या सूचना करायचे. मुळातच सुंदर सुरेल गाण्याचा वारसा - जोडीला भरपूर मेहनत. मंजूला बक्षीस न मिळतं तरच नवल ! अडतीस स्पर्धकांमध्ये तिचा पहिला नंबर आला होता ! मंजूला आभाळ ठेंगणं झालं होतं. पहिल्या दिवशी तिला हसणाऱ्या कुजकट पोरींची तिनं मस्त जिरवली होती.


लेकीचा स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक आला. तिला कुठं ठेवू अन् कुठं नाही असं मंजूच्या आईबाबांना झालं. बक्षीससमारंभ दुसरे दिवशीच होता. दोघा तिघांची भाषणं अन् पहिल्या तीन क्रमांकाची गाणीही यावेळी व्हायची होती. मंजूच्या बाबांनी मग त्या दिवशी सरळ अर्धी रजाच टाकली. कारण कार्यक्रम सुरू होता चार वाजता. बाबांनी नव्या इस्त्रीचे कपडे घातले. आई छानपैकी साडी नेसली. अन् मंजूला तर तिच्या आवडीचा नवा पंजाबी सूट आणला होता - बक्षीससमारंभासाठी. आईनं तिचं घड्याळही मंजूला घालायला दिलं होतं. अन् शहरातल्या स्मार्ट मुलींसारखं दिसलं पाहिजे म्हणून मंजूनं वेणीसुद्धा मैत्रिणीकडून घालून घेतली होती. त्या दिवशी मंजू खरंच छान दिसत होती.

बक्षीससमारंभ सुरू झाला. अगोदर भाषणं बिषणं. मग गाणी. आधी तिसऱ्या नंबरचं अन् मग दुसऱ्या नंबरचं गाणं झालं. त्यानंतर मंजूचं नाव पुकारलं गेलं. तिनं सुरुवात केली -

उमा महेश्वर हे श्रीशंकर
शंखशूलधर तू शशिशेखर ।

मंजूचं गाणं आज कालच्यापेक्षाही जास्त रंगलं. इतके दिवस घेतलेल्या मेहनतीचं चीज झालं होतं. दुधात नुसती साखरच नाही, केशरसुद्धा पडलं होतं. मंजूचं गाणं संपलं अन् टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. मंजू इतकं सुंदर गायली होती की तिथल्या तिथे तिला आणखी दोन बक्षीसं जाहीर झाली. मग तर काय. मंजूचा रथ अधांतरीच चालू लागला.

प्रत्यक्ष बक्षीसवितरण सुरू झालं. दुसऱ्या अन् तिसऱ्या नंबरचे दोघंही पोरगेच होते. त्यांनी तरातरा स्टेजवर येऊन बक्षीस घेतलं. अध्यक्षांशी शेकहॅंड केला. समोरच्या श्रोत्यांना नमस्कार ठोकला अन् ताडताड अबाउट टर्न केलं. आता बारी पहिल्या नंबरची. आपल्या मंजूची. तिचं नाव पुकारलं गेलं. पुन्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. नव्या ड्रेसमधली मंजू ओढणी सावरीत, सावकाश चालत बक्षीस घ्यायला गेली. अध्यक्षांनी तिच्या हातात बक्षीस दिलं. कौतुकभरल्या नजरेनं तिच्याकडे पाहिलं अन् शेकहॅंडसाठी हात पुढं केला.



पण - पण खुद्द मंजू मात्र एकदम बावचळूनच गेली होती.

कोड्यात पडली होती. शेकहँड करायचा ? अनोळखी पुरुषमाणसाशी ? बाप रे ! पुरुषांच्या नुसतं जवळ जरी उभं राहिलं तरी आजी कसली ओरडते ! आणि आता चक्क शेकहँड करायचा ? बरं, अध्यक्षसुद्धा कुणी वयस्क किंवा म्हातारे नव्हते. तसा तरुणच माणूस होता. काय करावं अन् काय नाही. मंजूला काय सुधरेचना. शहरी स्मार्ट मुलीचा कितीही आव आणला तरी आतून अजून ती वरुडकरच होती. ती एकदम गोंधळून गेली अन् अध्यक्षांना पटकन् नमस्कार करून मोकळी झाली !

ती बक्षीस घेऊन खाली आली अन् बाई म्हणाल्या ''तुझी तरी कमाल आहे - एवढी लहानशी मुलगी तू. शेकहँडला काय झालं ? शहरात अशीच पद्धत असते.'' बाईंनी तिला समजावून सांगितलं. पण मैत्रिणी ? हुं. त्या काय मोठ्या होत्या समजावून सांगायला ? भरसभेत त्यांनी शुक् शुक् शुक् शुक् सुरू केलं. एकीनं काय येडचाप आहेस अशी खूण केली. दुसरीनं कपाळाला हात लावला. तिसरीनं चक्क वेडावून दाखवलं. अन् खाणाखुणा करत, कुजबुजत, मंजूनं आता मात्र शेकहँडच करावा अशी सूचना त्या देऊ लागल्या. तोवर खास बक्षिसासाठी तिचं नाव पुकारलं गेलं.

ती स्टेजवर गेली. आता बाईंनीसुद्धा शुक्शुक् म्हणत, शेकहँडची खूण करत मंजूला इशारा दिला. मग तिनंसुद्धा बक्षीस स्वीकारलं अन् शेकहँडसाठी हात पुढे केला. पण यावेळी मात्र अध्यक्षच नमस्कार करून मोकळे झाले होते. हो ! मघाचाच अनुभव होता ना. इकडे श्रोत्यांनाही या सगळ्या प्रकाराची गंमत वाटू लागली. तेवढ्यात आता तिसऱ्या बक्षिसाची वेळ आली. आता मात्र मंजूच काय, अध्यक्षमहाराजसुद्धा गोंधळात पडले. शेकहँड की नमस्कार ? नमस्कार की शेकहँड ? काय करावं ? मंजू अध्यक्षांकडे अन् अध्यक्ष मंजूकडे थोडा वेळ बघतच राहिले ! पुढच्याच क्षणी मंजूनं हात पुढे केला अन् अध्यक्षांनी हसत हसतच तिच्याशी 'शुक्हँड' केला.

# शोधा म्हणजे

''बंडोबा, नीट संभाळून जा हं !'' आईनं सातव्यांदा सांगितलं. ''आणि तिकीट - तिकीट नीट ठेवायचं बरं का.'' बाबांनी तिसऱ्यांदा बजावलं. सात अन् तीन मिळून दहा वेळा बंड्यांनं जोरजोरात मान हलवून हो म्हटलं. इतक्या जोरात की आता आपली मान लचकेल की काय अशी त्याला भीती वाटली.

झालं होतं काय, बंड्या पहिल्यांदाच एकटा प्रवास करणार होता. आता प्रवास प्रवास तो काय - तर साधं पुण्याहून मुंबईला जायचं. तो तसा दोन तीन वेळा गेला होता मुंबईला. पण आईबाबांबरोबर. यावेळी मात्र एकटा चालला होता. म्हणून त्याला स्टेशनवर पोचवायला आई-बाबा, ताई-दादा- असे झाडून सगळेजण आले होते. काही गरज का होती ? सगळ्यांनी यायची ? म्हणजे न सांगताच सगळ्यांना जाहीर होतं ना - की बुवा हा मुलगा पहिल्यांदाच एकटा चाललाय म्हणून. त्यात पुन्हा सारखं आपलं सांभाळून जा, तिकीट नीट ठेव, चहा प्यायला खाली उतरू नकोस - एक ना दोन. सतरा सूचना. बंड्या अगदी वैतागून गेला अन् म्हणाला -

''मला सगळ्यांच्या सगळ्या सूचना अगदी तोंडपाठ झाल्या आहेत. मला आता कोणी काही सांगू नका ! मी काय कुकुलं बाळ आहे का ? चांगला पंधरा वर्षांचा धडधाकट मुलगा आहे.''

''बरं बाबा. नाही सांगत काही. आता गाडी सुटायची वेळ

झालीच आहे.'' बाबा म्हणाले.

''हो - पण ते बेसनाचे लाडू खा बरं का वाटेत.'' आईनं सूचना केलीच. त्यामुळे बंड्यानं अकराव्यांदा मान हलवली. मनात म्हणाला -

''हुं ! बेसनाचे लाडू म्हणे ! ते तर घरात असतातच. आता मुंबईच्या गाडीत, लोणावळ्याला चिक्की किंवा कर्जतचे बटाटेवडे सोडून लाडू का खात बसू ? आमच्या मॉंसाहेब म्हणजे अगदी ग्रेट आहेत.''

इतक्यात जोरात शिट्टी झाली आणि गाडी सुटली. अच्छाऽ ! टाटाऽऽ! वगैरे झालं आणि मग गाडीनं वेग घेतला. बंड्या आता आजूबाजूला बघू लागला. डबा गच्च भरला होता. आधीच दुपारची गाडी. त्यात आता सुट्ट्या सुरू झालेल्या. त्यामुळे डबा खचाखच भरला होता. आरक्षित डबा असूनही जास्तीचे लोक आत घुसतच होते. चौघांच्या बाकावर पाच पाच माणसं बसणं, मधल्या जागेवर ठिय्या मारून बसणं, मोकळ्या जागेवर पेट्या वगैरे रचून सामानाचा ढीग ठेवणं असे प्रकार चाललेले होते. त्यात पुन्हा विक्रेत्यांची गर्दी.

ती सगळी घूसखोरी बघून बंड्याला वाटलं - खरंच, आपलं सामान सांभाळलं पाहिजे हं ! आता सामान म्हणजे एक लहानशी सूटकेस आणि एक पिशवी फक्त होती. का असेना. सांभाळायला हवीच ना. आणि मुख्य म्हणजे तिकीट ! या एवढ्या गर्दीगोंधळात जर का आपलं तिकीट हरवलं तर कठीणच आहे.

त्यानं तिकीट विजारीच्या खिशात, छोट्याशा कागदी पाकिटात ठेवलं होतं. पण प्रवासात खिसा कापतात म्हणे ! तसा तिकीटाचा नंबर त्यानं वेगळ्या कागदावर लिहून ठेवला होता. तो पाठही करून टाकला होता. पण म्हणून काय झालं ? तिकीट आपलं नीट ठेवलेलं बरं. कुठे बरं ठेवावं ? सूटकेसमध्ये ? नको. बॅग अधेमधे उघडायची नाही असं त्यानंच ठरवलं होतं. कारण बॅगेत होते पैसे - आणि नवे कपडे. तर - बॅगेत नको. विजारीच्या खिशातही नको. मऽऽऽग ? सरळ आपलं पिशवीत ठेवावं. अगदी तळातली पॅंट आहे ना, त्या पॅंटच्या आणि

शर्टाच्या मध्ये ठेवावं. वर बाकीचं सामान आणि लाडवांचा डबा पण आहे. त्यामुळे तिकीट अगदी नीट सुरक्षित राहील.

त्याप्रमाणे बंड्यानं विजारीच्या खिशातून तिकीटाचं ते पाकिट काढलं आणि पिशवीत ठेवलं. तळातली पँट आणि वरचा शर्ट यांच्या घडीच्या मधोमध. अगदी नीट, व्यवस्थित, खुणेनं ठेवून दिलं. आता काही काळजी नाही ! पिशवी त्यानं मांडीवर ठेवली. पिशवीचे बंद गच्च धरून ठेवले. अन् मग बंड्या खिडकीतून बाहेरची मजा बघू लागला. पळणारी झाडं, डोंगर, दऱ्या, ढग, मंकी पॉईंटवरची माकडं - सगळं बघताना त्याला खूप गंमत वाटत होती. इतक्यात - तिकीट, तिकीट असं म्हणत तिकीटतपासनीस आला. बंड्यानं खिशात हात घातला. पण - पण खिशात तिकीट नव्हतंच ! आँ ? गेलं कुठं तिकीट ?



बंड्या विचारात पडला. अन् त्याला एकदम आठवलं - आपणच नाही का ते पिशवीत ठेवलं ? त्याबरोबर बंड्यानं हातभर जीभ बाहेर काढली. काय हा आपला वेंधळेपणा ! मग तो पिशवीतून तिकीट काढू लागला. त्यानं ते इतक्या खुणेनं ठेवलं होतं की अगदी डोळे मिटूनसुद्धा

# प्रसिद्धीच प्रसिद्धी

बालमित्रांनो ! तुम्हाला गोष्टीची पुस्तकं खूप खूप आवडतात. अन् त्या पुस्तकात, पुस्तकाच्या वरती, छानदार चित्रं असतील तर.? मग आणखीनच मज्जा. होय ना ? तर अशा एका गोष्टीच्या पुस्तकाची अन् पुस्तकावरच्या चित्राचीच गोष्ट आता मी तुम्हाला सांगणार आहे.

एक होते दौलतराव. दौलतराव मोठे मजेदार होते. त्यांच्या डोक्यात सारख्या कसल्या तरी नव्या नव्या कल्पना यायच्या. की मग ते त्याच्याच मागे लागायचे. एकदा त्यांच्या मनात आलं की आपण कुणी तरी प्रसिद्ध माणूस व्हावं. कारण काय माहीताय ? प्रसिद्ध लेखक गोविंदराव हे त्यांच्या शेजारीच राहायचे. गोविंदरावांचं सारखं कशाकशात नाव छापून यायचं. कधी कधी फोटो छापून यायचे. त्यांची सारखी कुठेकुठे भाषणं असायची. ते सगळं पाहून दौलतरावांना वाटायचं, आपणही गोविंदरावांप्रमाणे लेखक व्हावं अन् प्रसिद्धी मिळवावी.

आता मारे लेखक व्हायचं ठरवलं, पण ते लेखन जमायला नको का ? दौलतरावांना तर काहीसुद्धा नवीन लिहिता येत नव्हतं. पण दौलतरावांनी एकदा ठरवलं म्हणजे ठरवलं. मग माघार नाही. त्यांना ऐकून माहीत होतं, की बिरबल, इसाप किंवा तेनालीराम वगैरेंच्या गोष्टी आपण आपल्या नावानं लिहिल्या तरी चालतं. मग काय, दौलतरावांनी पंधरा दिवस बैठक मारून काम केलं अन् चांगल्या आठ दहा गोष्टी लिहून काढल्या.

मग दौलतरावांना वाटलं की या सगळ्या गोष्टींचं एक छानसं पुस्तकच करावं. अऩ् आपणच ते पुस्तक काढावं. होईल थोडासा खर्च. पण तेवढा करायचा. त्याशिवाय प्रसिद्धी कशी मिळणार ? तर - ठरलं. या सगळ्या गोष्टींचं एक झक्कपैकी पुस्तक काढायचं. पुस्तकाला उत्तम कागद वापरायचा. छपाई उत्तम करायची. आणि हो, पुस्तकावर मस्तपैकी रंगीत चित्रपण छापायचं. तेसुद्धा . एखाद्या मोठ्या अन् प्रसिद्ध चित्रकाराचंच घ्यायचं.

चित्र कुणाचं बरं घ्यावं ? अंऽऽ - जयदेवांचं घ्यावं. ते एकदम बडे चित्रकार आहेत. त्यांचंच घ्यावं. पण - मिळेल का त्यांचं चित्र ? त्यांना म्हणे वेळ नसतो. खूप कामं असतात. मग दौलतरावांनी केली युक्ति. त्यांनी गोविंदरावांचाच वशिला लावला. गोविंदराव जयदेवांचे मित्रच होते. त्यांची चिठ्ठी घेऊनच दौलतराव जयदेवांना भेटायला गेले.

नाही म्हटलं तरी चिठ्ठीचा उपयोग झाला, अन् दौलतरावांच्या पुस्तकासाठी चित्रं काढायचं जयदेवांनी कबूल केलं. मग कव्हरचं चित्र असं हवं, तसं हवं वगैरे सूचना दौलतरावांनी दिल्या. पैशाची काळजी करू नका असंही पुन्हा पुन्हा सांगितलं. पंधरा दिवसांनी परत भेटायचं ठरलं.

त्या पंधरा दिवसांत दौलतरावांना दुसरं काही सुचत नव्हतं. आपलं पुस्तक - अन् पुस्तकाची चित्रं ! खरंच, कशी असतील चित्रं ? आणि कव्हरचं - मुखपृष्ठाचं - चित्र ? ते तर अगदी मस्तच असणार म्हणा. शिवाय रंगीबेरंगी. आपण नशीबवान. म्हणून आपल्याला जयदेवांकडून चित्रं मिळणार आहेत, वगैरे विचारात दौलतराव दंग होते.

तुम्हाला ती हत्तीची अन् मुंगीची गोष्ट माहीत आहे ना ? एक गर्विष्ठ हत्ती मुंग्यांचं वारूळ मोडून टाकतो. आपल्या पायाखाली मुंग्यांना चिरडून टाकतो. मग त्यातलीच एक मुंगी हत्तीच्या कानात शिरते. तिथे दंश करते. ते हत्तीचं मर्मस्थान असतं. त्यामुळे हत्तीला भयंकर वेदना होतात. ती एवढीशी चिमुकली मुंगी - हत्तीला धडा शिकवते. अशी एक

गोष्ट. त्या गोष्टीवर पुस्तकाच्या कव्हरचं चित्र काढायचं असतं.

ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी, दौलतराव डुलत डुलत जयदेवांकडे चित्रं न्यायला आले. ते भलतेच खुशीत होते. आपलं छान छान पुस्तक अन् जयदेवांची छान छान चित्रं. मग काय विचारता. आपलं पुस्तक खूप गाजणार. हातोहात खपणार, अन् आपण अगदी सुप्रसिद्ध होणार ! दौलतराव त्याच विचारात गुंग होते. जयदेवांची चित्रं सहजासहजी मिळत नसत. ती आपल्या पुस्तकाला मिळाली याचा दौलतरावांना खूपच आनंद झाला होता. त्या आनंदाच्या भरातच त्यांनी चित्रं बघायला सुरुवात केली.

चित्रं सुंदरच होती. कव्हरचित्र तर खूपच मस्त होतं. दौलतरावांना चित्रं आवडली - पण तरी त्यांना काही शंका होत्या. ते जयदेवांना म्हणाले -

''अहो, ही सगळी गोष्ट जंगलात घडते. तर तुम्ही ना, पाठीमागे असं दाट जंगल दाखवा. मोठमोठी झाडं, मध्येच रानवेली, त्यांवर रंगीबेरंगी फुलं - असं सगळं काढायला हवं होतं. मी तुम्हाला तसं सांगितलं होतं !''

जयदेव शांतपणानं म्हणाले, ''त्याचं काय आहे, तसं काढलं तर चित्र गिचमीड दिसेल.''

''अन् काय हो, हत्ती तर तुम्ही निळाच काढलाय. हत्तीचा रंग असा कुठं असतो का ? काळा करडा असतो.'' दौलतरावांनी आणखी एक शंका काढली.

''अं - हो. पण चित्र छापून झाल्यावर निळा हत्ती छान दिसेल.'' जयदेवांनी समजावून सांगितलं. पण एवढ्यानं समजूत पटली तर ते दौलतराव कसले ? शिवाय त्यांना वाटलं, जयदेवांनी सांगितले तेवढे पैसे आपण देणार आहोत, मग आपण सांगितल्या तेवढ्या सूचना जयदेवांनी नकोत का पाळायला ?

''चित्रात मुंगी फारच लहान काढलीय हो तुम्ही.'' दौलतरावांनी



आणखी एक तक्रार काढली.

''आता मुंगी ती केवढी. अन् हत्तीपुढे मुंगी लहानच नाही का दिसणार ?'' जयदेव म्हणाले.

''ते झालं, पण माझ्या गोष्टीत मुंगी मोठी महत्त्वाची आहे हो ! अन् चित्रात मात्र तुम्ही ती एवढीशीच काढलीत. मुंगी मोठीच काढा तुम्ही.'' दौलतराव आग्रहानं म्हणाले. त्यांना चित्रकलेतलं ओ की ठो कळत नव्हतं. अन् तरी जयदेवांवर सूचनांचा भडिमार चालला होता.

आता मात्र जयदेवांना राग येऊ लागला. सूचना करायला हरकत नव्हती - पण या असल्या सूचना ? खरं म्हणजे चित्रकाराला किती विचार करून चित्र काढावं लागतं. त्या चित्रातले रंग, पुस्तकाचा आकार, छपाईचं तंत्र, सगळं संभाळावं लागतं. तेव्हा कुठे छान चित्र तयार होतं ! दौलतरावांना तर त्यातलं काहीच समजत नव्हतं अन् चालले जयदेवांना शहाणपण शिकवायला ! जयदेवांना इतका राग आला की उत्तरसुद्धा द्यावंसं वाटेना. पण ते गप्प बसले तर उलट दौलतरावांना जास्तच चेव आला. ते म्हणाले -

''गरीबांवर, दुबळ्यांवर अन्याय झाला तर तेसुद्धा प्रतिकार करतात. चिमुकली मुंगीसुद्धा हत्तीला शिक्षा करू शकते.

दीनदुबळ्यांवर अन्याय करू नये, असा संदेश या कथेत आहे. केवढा महान संदेश आहे. हा संदेश तुम्ही चित्रात दाखवा.''

जयदेव गप्पच. मनात म्हणाले - '' हा अगदीच येडचाप दिसतोय. काय बोलायचं याच्याशी ?'' पण दौलतरावांना कशाचंही ढिम्म नव्हतं. त्यांची आपली बडबड सुरूच.

''हे बघा जयदेव, तुम्ही थोऽऽडं माझं ऐका. तुम्ही ना, मुंगी मोठी काढा. अन् ती अशी रागारागानं हत्तीकडे बघतेय असं दाखवा.'' दौलतरावांनी सांगितलं.

आता मात्र जयदेव जाम वैतागले अन् म्हणाले - ''मुंगीचं मला माहीत नाही. पण आता ना, मीच रागावलो आहे. तुमचं पुष्कळ ऐकून घेतलं. आता हे गोष्टीचं बाड उचला - अन् चालू लागा. कृपाकरून पुन्हा माझ्या घरी पाऊल टाकू नका !''

दौलतरावांच्या पुस्तकाचं पुढं काय झालं ? ते कोणालाच माहीत नाही. पण त्यांनी जयदेवांबरोबर कसा वाद घातला या गोष्टीला मात्र सगळीकडे प्रसिद्धीच प्रसिद्धी मिळाली !

# माठ आणि माठ

म. ग्रं. सं. ठाणे, बाल वाङ्‌मय शाखा,
बाल वाङ्‌मय विभाग
दा. क्र. 3070 दिनांक 9/7/98
विषय बा.वा. क्र.

छोटू म्हणजे अगदी ग्रेट मुलगा आहे. त्याला नुसतं पाहिलं तरी एकेकाला हसू येतं. अहं ! तसा तो दिसायला काही बावळट ध्यान वगैरे नाहीये. अगदी व्यवस्थित, नीटस, तरतरीत आहे. अभ्यासातही बऱ्यापैकी आहे. म्हणजे वरकरणी तरी सगळं काही आलबेल ! पण तरीसुद्धा दर दोन-चार दिवसांनी आईच्या तोंडून वाक्य येतं - "छोटू, हात टेकले रे बाबा तुझ्यापुढे !" याचं कारण, छोटूचं डोकं कसं चालेल याचा मुळी भरवसाच नसतो !

परवाचीच गोष्ट. छोटूची युनिट टेस्ट होती. मराठीचा पेपर देऊन स्वारी घरी आली. अगदी हसत आणि खुशीत. छोटूचा हसरा चेहरा बघून आईलाही बरं वाटलं. तिनं मोठ्या कौतुकानं विचारलं -

"आला का राजा ? मस्त गेला ना पेपर ?"

"होऽऽ ! एकदम मस्त ! खूप सोप्पा होता. आणि आई, अग, आम्हाला पेपरात ना, पोळ्यांची माहिती विचारली होती. मी सगळ्या प्रकारच्या पोळ्या लिहिल्या. पुरणाच्या, खव्याच्या, सांजाच्या, गुळाच्या, साखरेच्या, आंब्याच्या, फणसाच्या - अगदी खापरपोळ्यासुद्धा लिहिल्या. आमच्या वर्गात ना, खापरपोळ्या कुणाला माहीतसुद्धा नव्हत्या -" छोटू उत्साहानं सांगत होता, अन् आई मात्र गोंधळात पडली. मराठीच्या पेपरात पोळ्यांची माहिती कशासाठी ? तिला काही समजेचना. म्हणून म्हणाली -

''बघू, बघू, दाखव बरं प्रश्नपत्रिका -''

छोटूनं खिशातून प्रश्नपत्रिका काढली. अन् वाचता वाचता आई एके ठिकाणी थबकली. तिथं लिहिलं होतं -

''पोळ्याबद्दल सुमारे वीस ओळीत माहिती लिहा.''

आई म्हणाली - ''कमाल आहे बाबा तुझी ! खायच्या पोळ्या नव्हेत - पोळा या सणाबद्दल माहिती लिहायची होती. बैलपोळ्याचा सण नुकताच नाही का झाला ? शाळेला सुट्टी होती ना ? बैलांची पूजा का करतात ? कशी करतात ? गोड काय करतात ? ते लिहायचं सोडून हे काय लिहून ठेवलंस ?'' आईनं हात उगारला. छोटूनं आधी जीभ बाहेर काढली. नंतर तोंडात बोट घातलं. मग बोटं झाडली. नंतर अक्षरशः कपाळाला हात लावला. आपली चूक त्याला आत्ता कुठं कळली ! तोवर त्याला वाटलं होतं - पोळ्यांची एवढी व्हरायटी माहीत असल्याबद्दल पेपर वाटताना सर शाबासकी देतील ! पण - पण आता मात्र भर वर्गात फटफजितीची वेळ येणार ! त्या कल्पनेनंच छोटू रडवेला होऊन गेला.

एकदा छोटूला मावशीनं जेवायला बोलावलं. सहज. शाळेला सुट्टी होती म्हणून. मावशीचं घर लांब, तिकडे मंडईजवळ होतं. मावशीकडे गेलं की येताना आईची काही बाही खरेदी ठरलेलीच असे. भाजी, फळं, वाणसामान, कधी प्लास्टिकची बादली नाही तर तुळशीबागेतून चाळणी, असलं काही तरी ती घ्यायचीच. मग त्या दिवशी छोटूनं अगदी शहाण्या मुलासारखं विचारलं -

''आई ग, तिकडून येताना काही आणायचंय का ?''

आईला अगदी बरंऽऽ वाटलं. लोकांना वाटतो तेवढा आमचा छोटू काही येडचाप नाही हो, असं ती मनाशी म्हणाली. अन् तेवढ्यात छोटूनं अधीरपणानं पुन्हा विचारलं -

''सांग ना आई, तिकडून येताना काही आणायचंय का ?''

आईला जरा प्रश्नच पडला. खरं म्हणजे आणायचं असं काहीच नव्हतं. सगळं सामान तिनं नुकतंच आणून टाकलं होतं. भाजीसुद्धा

घेऊन आली होती. पण छोटूचा उत्साह बघून त्याला नाउमेद कशाला करा - असं आईला वाटलं. म्हणून ती म्हणाली,

"अंऽ बरं - माठ आण माठ."

आणि संध्याकाळी भला थोरला मातीचा माठ घेऊन छोटू हजर ! आई थक्क होऊन बघतच राहिली. छोटू मातीचा माठ घेऊन येईल असं तिला वाटलंसुद्धा नव्हतं ! तिच्या मनात होती माठाची भाजी. पण छोटूला वाटला मातीचा माठ. तो मुद्दाम मावशीला घेऊन मंडईसमोरच्या कुंभारआळीत गेला होता. "मावशी, तू चांगला बघून दे ग-" असंसुद्धा त्यानं म्हटलं होतं. पण एवढा शहाणपणा चालवूनसुद्धा शेवटी गोंधळ झालाच. "काय हे छोटू ! माठ आहेस बघ नुसता -" आई वैतागून म्हणाली. म्हणजे छोटूच शेवटी माठ काय ? छोटू बिचारा खट्टू होऊन गेला.



छोटू आता हळूहळू वर्तमानपत्र वाचायला लागला होता. टीव्हीचे कार्यक्रम, सिनेमाच्या जाहिराती, छोट्या बातम्या - इतपतच त्याचं वाचन असायचं. रोजच्या वर्तमानपत्रात मुलांनी वाचण्याजोगतं असतं तरी

काय ? फक्त रविवारी मात्र मुलांसाठी गोष्ट, कविता, असं छान छान असतं. तर ते एक असो. पण छोटूला वर्तमानपत्र वाचायची हळू हळू गोडी लागली एवढं खरं. वाचता वाचता तो मध्येच आईला काहीतरी सांगायचा -

"आई, अमिताभच्या सिनेमाचा पन्नासावा आठवडा-" "आई, अग पोलिस अधिकाऱ्यांच्या घरी चोरी-"

छोटू त्याच्या दृष्टीनं महत्त्वाच्या बातम्या बघत होता. बघता बघता तो एकदम म्हणाला -

"आई ग, या देवाचं नाव किती छान आहे !"

"अरे, देवाची सगळीच नावं छान असतात-" आई म्हणाली.

पण छोटू म्हणाला, "अग पण हे बघ ना. श्रीखंडोबा ! म्हणजे - म्हणजे श्रीखंडाचा देव ! आई, त्या देवाला श्रीखंड खूप आवडतं का ग ? गणपतीला मोदक आवडतात तसं ?" छोटू उत्साहानं, कुतूहलानं विचारत होता. त्याचे मोठेमोठे डोळे आणखीनच मोठाले दिसू लागले. आई म्हणाली - "श्रीखंडोबा ? बघू बघू -"

आईनंसुद्धा ते नाव कधी ऐकलं नव्हतं. आई वाचू लागली. तिथं लिहिलं होतं - "श्री खंडोबा देवस्थान उत्सव."

"छोटू, अरे खंडोबा देवाचा उत्सव आहे तो -" आईनं नीट समजावून सांगितलं. त्याबरोबर छोटूलासुद्धा खुदकन् हसू आलं.

पण कधी तरी छोटूच्या बोलण्यानं अगदी बाका प्रसंग यायचा. त्या दिवशी छोटू सतीशकडे खेळायला गेला होता. सतीशच्या आजीनं सहज विचारलं, "काय छोटू, तुझी आजी काय करतेय ?"

"अं-अं-आजी ना - आजी - म्हणजे आजी लावालावी करतेय." छोटूनं आठवून सांगितलं. अन् सतीशची आजी एकदम चाट ! मग तिनं परत विचारलं, " काय म्हणालास ? आजी काय करतीय ?"

"आजी लावालावी करतीय. तिला ना लावालावी करायला खूप

आवडतं.'' छोटूनं असं सांगितल्याबरोबर सतीशच्या आजीनं एकदम कान टवकारले. डोळे एवढे एवढे केले. आवाज बारीक केला. अन् मोठ्या लाघवीपणानं विचारलं -

''आज़ीला लावालावी करायला खूप आवडतं ? कोण रे म्हणतं असं ?''

''आई ! तीच त्या दिवशी सरितामावशीला सांगत होती.'' छोटूनं आईचा अन् सरितामावशीचा संवाद अगदी साभिनय म्हणून दाखविला.

मग त्या दिवशी आजी देवळातून आली ती तणतणतच. आल्या आल्या तिनं चपला भिरकावल्या. तरातरा मोरीत जाऊन हातपाय धुतले अन् दाणदाण पावलं टाकीत सोफ्यावर धप्पकन् बसून राहिली. टीव्ही लावलेलाच होता. मराठी नाटक चालू होतं. सगळेजण बघत होते. पण आजीचा हा असा अवतार बघून सगळेजण चकितच झाले ! फक्त कुणी बोललं मात्र नाही. आई आणि बाबा एकमेकांकडे बघू लागले. चेहरे प्रश्नार्थक. अन् छोटू तर पुरता गोंधळून गेलेला. हां. तशी आजी जराशी तापटच, पण जराशीच. तिला इतकं रागावलेलं कुणीच पाहिलं नव्हतं. तिचं काय बिनसलंय हे कुणालाच कळेना ! नाटक संपलं तरी आजी उठली नाही. तिथंच टीव्ही बघत बसून राहिली.

इकडे आईनंच देवापुढे दिवा लावला. मग कुकर लावला. स्वैपाक झाला तरी आजी घुम्मच ! जेवायची वेळ झाली. छोटू अन् बाबा, दोघेजण तिला जेवायला बोलावू लागले. आजी रागानं फिस्कारून म्हणाली, ''तुम्ही घ्या जेवून !'' मग आई स्वतः आजीला बोलवायला गेली.

''सासूबाई, चलताय ना जेवायला ? तुमच्या आवडीची भरली वांगी केलीएत-''

''काही नको लाडीगोडी ! इकडे मैत्रिणीपाशी सासूची नालस्ती करायची, तिच्याबद्दल खोटंनाटं बोलायचं-''

''सासूची नालस्ती ? खोटंनाटं ? काहीतरीच काय -'' आई

आजीला कधीच नावं ठेवायची नाही. पण आजी म्हणाली -

''परवा तुझी ती ढालगज मैत्रीण आली होती. केस कापणारी-भुंड्या हाताची -''

''कोण ? सरिता ?''

''होय. तीच ती. तिला काय सांगितलंस माझ्याबद्दल ?''

''सरिताजवळ ? अन् मी ? काही नाही बाई.''

''हुंऽ! काही नाही म्हणे. छोटूला विचार. मी काय खोटं बोलत नाही. '' आजी उमाळ्यानं म्हणाली अन् तिनंच छोटूला विचारलं -

''काय रे छोटू ! देशपांडीणबाईंना - तुझ्या त्या सतीशच्या आजीला - काय सांगत होतास ? आई म्हणे म्हणते की आजीला लावालावी करायला फाऽऽर आवडतं - नाही का ? काय काय म्हणाली आई ? सांग बघू खरं खरं.''

आजीच्या संतापाचं कारण आता सगळ्यांना समजलं. पण तरीसुद्धा आई असं म्हणालीच नव्हती ! मग आईनंही छोटूला दरडावलं. ''काय रे, मी काय सांगितलं सरिताजवळ ?''

''तूच सरितामावशीला सांगत होतीस, हे कपाट लाव, ती खोली लाव, सारखं चाललेलं असतं. सासूबाईंना असल्या कामाची फार आवड आहे. हे सगळं मी सतीशच्या आजीला सांगितलं आणि आजी लावालावी करतेय असंसुद्धा सांगितलं.''

छोटूचा खुलासा ऐकता ऐकता आई-बाबांचाच काय, आजीचा चेहरासुद्धा पालटला. तिघांच्याही चेहऱ्यावर हसू फुटलं. आजी पदर खोचत म्हणाली, ''अग्गोबाई ! बरीच आहे की देशपांडीण ! स्वतःच लावालावी करते अन् माझ्या सुनेवर नाव घेते काय ? भेटू दे उद्या देवळात - काढतेच तिची चांगली !'' आईनं छोटूला जवळ घेतलं अन् त्याच्या पाठीवरून हात फिरवला. आपल्या बोलण्यावर एरव्ही रागावणारी आई आज एवढी खुश का ? हे मात्र छोटूला कळलं नाही.

# खास बक्षीस

"ए ! ढोल्याची मजा माहीताय का ?" बिङ्ग्यानं पिल्लू सोडलं.

"काय रे, काय - काय ?" सगळ्यांना उत्सुकता.

"सक्काळी सक्काळी ना - पळायला जातो आताशा."

"आईशप्पत ! काय ध्यान दिसत असेल नाही पळताना ?"

"बिङ्ग्या - तू लेका लकी, तुला ही गंमत रोज बघायला मिळते."

"हुं ! रोज कुठलं ? परवापासून तर सुरुवात झाली. शाळेला सुट्टी होती ना दोन दिवस - म्हणून तुम्हाला आज सांगतोय."

"पळायच्या जोडीला थोडं डाएटिंग कर म्हणावं."

"काहीतरीच काय ? डाएटिंग बायका करतात ना ?"

"ए हे रे ! बावळट आहेस नुसता. जे कोण खूप लठ्ठ असेल ना, त्यानं डाएटिंग करायचं असतं. मग बायका असोत की पुरुष."

पोरांच्या गप्पा ऐन रंगात आलेल्या. अन् नेमकी त्याच वेळी शाळेची घंटा ठणाणली ! गप्पांचा विरस झाला. दप्तरं उचलून मुलांनी वर्ग गाठला.

शाळा सुरू झाली. पण समीरचं अभ्यासात लक्षच लागेना. बिङ्ग्यानं सांगितलेली नवीन गंमत - तीच त्याच्या डोक्यात घोळत होती. ढोल्या पळायला जातो – खरंच पळताना कसला विनोदी दिसत असेल



आधीच रस्ता वाईट. त्यात सगळीकडे पावसानं निसरडं झालेलं. त्यामुळे पाय घसरून ढोल्या सपशेल आदळला होता. हातातलं दप्तर एकीकडे, डबा दुसरीकडे, पाण्याची बाटली घरंगळून तिसरीकडे, अन् चित्रकलेचे रंग, ब्रश, बशा - सगळीकडे विखरून पडलं होतं. सुंदर इस्त्रीचा गणवेष चिखलानं भरला होता. अन् पुस्तकाची पानं वाऱ्यावर फडफडत होती. समीरनं क्षणभर ढोल्याकडं पाहिलं अन् मनाशी म्हणाला – ''छान झालं. असंच पाहिजे ! आमच्याशी शिष्टासारखं वागताना बरं वाटतं ना ?''

समीरला वाटलं - येईल तो उठून आपला आपण. स्पर्धेची वेळ झाली आहे. तिकडं लवकर गेलं पाहिजे. एवढ्यात - आई ग ! आई आई ! असं ढोल्याचं विव्हळणं समीरनं ऐकलं. ऐकलं - अन् समीरचं पाऊल थबकलं. त्याला पुढं जाववेना. समीरनं हातातल्या घड्याळात पाहिलं - अकरा वाजले होते. तिकडे स्पर्धा सुरू झाली असेल !

पण - पण तो आता थांबला. ढोल्याच्या जवळ जाऊन म्हणाला, ''फार दुखतंय का रे ?'' ढोल्यानं कण्हतच 'हो' म्हटलं. तो चांगला

सणकून आपटला होता. पाय मुरगळला होता. नुसता ठणकत होता. अन् डोळ्यातलं पाणी तो कसंबसं आवरत होता.

समीरनं ढोल्याला आधी बसतं केलं. त्याचं सगळं सामान एकत्र केलं. त्याला पाणी प्यायला दिलं. मग ढोल्याला आधार देत हळूहळू उभं केलं. अन् त्याला घेऊन, सावकाश, थांबत थांबत तो शाळेकडे निघाला.

ज्याची मस्त जिरवायची होती. ज्याची फटफजिती करायची होती, त्या ढोल्याला समीर मदत करीत होता !

स्वतःच्या नकळत, पण मनापासून ! ते दोघं शाळेत पोचले तोवर साडेअकरा वाजून वर पाच मिनिटं झाली होती म्हणजे आता वर्गात प्रवेश नाही. स्पर्धेत भाग नाही. स्पर्धा तर बुडालीच - अन् बक्षीसही हुकलं !

स्पर्धेच्या वेळेपूर्वी दहा मिनिटं हजर राहिलं पाहिजे, आणि अकरा दहानंतर कुणालाही प्रवेश मिळणार नाही, असं सरांनी बजावून सांगितलं होतं. फार तर सव्वाअकरापर्यंत प्रवेश मिळाला असता. पण आता ? शक्यच नाही. दोघंही पायरीवर सुन्नपणे बसून राहिले.

''समीर, माझ्यामुळे तुझी स्पर्धा बुडली.'' ढोल्याला वाईट वाटलं.

''असू दे रे.'' समीरनं म्हटलं.

इकडे स्पर्धेसाठी समीर आला नाही याचं सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं. तो लांब राहतो. कदाचित थोडा उशीर होईल. पण तो नक्की येईल असं मित्रांना वाटत होतं. सरांनाही तसंच वाटत होतं. पण - पण समीर आलाच नाही !

समीर का आला नाही, त्याला यायला उशीर का झाला हे कळलं तेव्हा सारे मित्र आणि सर सुद्धा चकित झाले.

सर म्हणाले- ''अरे, बोलला असतास तसं, तर स्पर्धेत दोघांनाही प्रवेश मिळाला असता. आम्ही जास्तीचा वेळसुद्धा दिला असता. का असेना, मुलांनो ! समीरनं आज एवढं चांगलं काम केलंय - स्पर्धेत भाग नसतानाही त्याला मी खास बक्षीस देणार आहे. मला

नाही ? एखाद्या भोपळ्याला हातपाय फुटल्यासारखा. ध्यान नुसतं. पळता पळता आपटला एखाद दिवशी म्हणजे कळेल. परवा कसं केलंन ? त्याचं गोष्टीचं नवं पुस्तक बघू म्हटलं. वाचायला देणं दूरच. मला हातसुद्धा लावू दिला नाही ढोल्यानं. शिष्ट कुठला !

ढोल्याचं खरं नाव होतं नंदन. पण या सुंदर नावानं शाळेतला एकही मुलगा त्याला हाक मारायचा नाही. ढोल्या हेच त्याचं नाव पडलं होतं. कारण ? तो अंगानं होताच बोदल्या. हां ! पहिल्यांदा तो छान गुटगुटीत वाटायचा. पण आता ? कसला लठ्ठ अन् फोफसा झाला होता. मग काय, ढोल्या हेच त्याचं नाव पडलं.

मुलं चिडवायची. पण ढोल्या मात्र त्या मानानं शांत राह्यचा. काय करणार बिचारा ? हो ! राग आला तरी कुणावर रागानं धावून जाणं शक्य नव्हतं. बरं - आलीच वेळ भांडणाची, तरी कुणाशी दोन हात करणंही जमणार नव्हतं. त्या लठ्ठंभारतीला थोडीच पळापळ करता येणार होती ? त्यामुळे नाइलाजानं तो गप्प बसायचा.

पण म्हणून काय ढोल्याला राग येतच नसेल का ? यायचा. त्यालाही राग यायचा. त्यालाही वाईट वाटायचं. तो खिन्न होऊन एकटाच अन् आपल्याच विचारात बसून राह्यचा. अशा वेळी कुणी काही विचारलं तरी ढोल्याचं लक्षच नसायचं. अन् मुलांना मात्र वाटायचं की ढोल्या शिष्ट आहे. लहरी आहे. वडील मोठे अधिकारी आहेत म्हणून ढोल्याला ऐटी वाटते. एक ना दोन.

त्या दिवशी कमालच झाली. दहा मिनिटांच्या सुट्टीत ढोल्या गोष्टीचं पुस्तक वाचत होता. नवं कोरं पुस्तक. आत सुंदर सुंदर चित्रं आणि तीही रंगीत ! समीरनं बघितलं. म्हणाला -"वा ! काय मस्त चित्रं आहेत रे. मला दाखव ना जरा पुस्तक !"

समीरला चित्रं काढायला खूप आवडायचं. त्याचं ड्रॉईंग चांगलं होतं. त्याला चित्रकलेत बक्षिसंही मिळाली होती. चित्रांचं पुस्तक पाहिल्यावर समीरनं साहजिकच ते ढोल्याला मागितलं. पण ढोल्यानं

पुस्तक मिटून पटकन् दप्तरात ठेवून दिलं. समीरला दाखवलंसुद्धा नाही !

कारण ते पुस्तक पाहुण्यांचं होतं ! त्यांच्या मुलासाठी त्यांनी मुद्दाम विकत आणलेलं. घरात बघताना चुकून दप्तरात राहिलेलं. ढोल्याला एकदा वाटलं - समीरला दाखवावं पुस्तक. पण समजा, तेवढ्यात आणखी दुसरी मुलं आली तर ? त्यांनीही बघायला मागितलं तर ? ही सगळी विचित्र पोरं आहेत. व्रात्य नुसती. पुस्तक वाटेल तसं हाताळतील. ओढाओढी करतील. फाडतीलसुद्धा ! या पोरट्यांचा काही नेम नाही. मला एवढं चिडवतात - पुस्तकाचं काहीही करतील. म्हणून त्यानं पुस्तक एकदम घाईघाईनं दप्तरात ठेवून दिलं.

त्यामुळे समीरला राग आला. तो ढोल्यावर भयंकर चिडला. ''काय तुझ्या पुस्तकाला सोनं लागून गेलंय का ? साधा हातसुद्धा लावू दिला नाहीस. शिष्ट कुठला. याद राख बच्चमजी. याचं उट्टं काढीन, तरच नावाचा समीर !'' समीरनं ढोल्याला सुनावलं. मग चार पाच दिवस असेच तण्णातण्णीत गेले. ढोल्याचा सगळ्यांनाच राग आला. समीरच्या कंपूनं ढोल्याशी कट्टी घेतली. कुणीच त्याच्याशी धड बोलत नव्हतं. अन् समीर तर संधीची वाटच बघत होता. या ढोल्याची मस्त जिरवलीच पाहिजे एकदा !

अन् तशी संधी समीरला लवकरच मिळाली. संमेलनानिमित्त त्या दिवशी शाळेत चित्रकलास्पर्धा होती. खूप मुलांनी भाग घेतला होता. समीरनं तर पहिल्यांदा नाव दिलं. स्पर्धेचा दिवस उजाडला. अकरा वाजता स्पर्धा सुरू व्हायची होती. समीरनं स्वतःचं सगळं पटापट आवरलं. रंग, ब्रश, पाणी सगळं सामान नीट घेतलं, अन् तो निघाला.

पण बस नेमकी त्या दिवशी इतकी उशीरा आली ! आता समीर शाळेत जेमतेम वेळेवरच पोचणार होता. स्टॉपवरून तो भराभरा पावलं टाकत शाळेकडे निघाला. इतक्यात त्याला दिसलं - ढोल्याचा भररस्त्यावर साष्टांग नमस्कार !



आधीच रस्ता वाईट. त्यात सगळीकडे पावसानं निसरडं झालेलं. त्यामुळे पाय घसरून ढोल्या सपशेल आदळला होता. हातातलं दप्तर एकीकडे, डबा दुसरीकडे, पाण्याची बाटली घरंगळून तिसरीकडे, अन् चित्रकलेचे रंग, ब्रश, बशा - सगळीकडे विखरून पडलं होतं. सुंदर इस्त्रीचा गणवेष चिखलानं भरला होता. अन् पुस्तकाची पानं वाऱ्यावर फडफडत होती. समीरनं क्षणभर ढोल्याकडं पाहिलं अन् मनाशी म्हणाला – ''छान झालं. असंच पाहिजे ! आमच्याशी शिष्टासारखं वागताना बरं वाटतं ना ?''

समीरला वाटलं - येईल तो उठून आपला आपण. स्पर्धेची वेळ झाली आहे. तिकडं लवकर गेलं पाहिजे. एवढ्यात - आई ग ! आई आई ! असं ढोल्याचं विव्हळणं समीरनं ऐकलं. ऐकलं - अन् समीरचं पाऊल थबकलं. त्याला पुढं जाववेना. समीरनं हातातल्या घड्याळात पाहिलं - अकरा वाजले होते. तिकडे स्पर्धा सुरू झाली असेल !

पण - पण तो आता थांबला. ढोल्याच्या जवळ जाऊन म्हणाला, ''फार दुखतंय का रे ?'' ढोल्यानं कण्हतच 'हो' म्हटलं. तो चांगला

सणकून आपटला होता. पाय मुरगळला होता. नुसता ठणकत होता. अन् डोळ्यातलं पाणी तो कसंबसं आवरत होता.

समीरनं ढोल्याला आधी बसतं केलं. त्याचं सगळं सामान एकत्र केलं. त्याला पाणी प्यायला दिलं. मग ढोल्याला आधार देत हळूहळू उभं केलं. अन् त्याला घेऊन, सावकाश, थांबत थांबत तो शाळेकडे निघाला.

ज्याची मस्त जिरवायची होती. ज्याची फटफजिती करायची होती, त्या ढोल्याला समीर मदत करीत होता !

स्वतःच्या नकळत, पण मनापासून ! ते दोघं शाळेत पोचले तोवर साडेअकरा वाजून वर पाच मिनिटं झाली होती म्हणजे आता वर्गात प्रवेश नाही. स्पर्धेत भाग नाही. स्पर्धा तर बुडालीच - अन् बक्षीसही हुकलं !

स्पर्धेच्या वेळेपूर्वी दहा मिनिटं हजर राहिलं पाहिजे, आणि अकरा दहानंतर कुणालाही प्रवेश मिळणार नाही, असं सरांनी बजावून सांगितलं होतं. फार तर सव्वाअकरापर्यंत प्रवेश मिळाला असता. पण आता ? शक्यच नाही. दोघंही पायरीवर सुन्नपणे बसून राहिले.

''समीर, माझ्यामुळे तुझी स्पर्धा बुडली.'' ढोल्याला वाईट वाटलं.

''असू दे रे.'' समीरनं म्हटलं.

इकडे स्पर्धेसाठी समीर आला नाही याचं सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं. तो लांब राहतो. कदाचित थोडा उशीर होईल. पण तो नक्की येईल असं मित्रांना वाटत होतं. सरांनाही तसंच वाटत होतं. पण - पण समीर आलाच नाही !

समीर का आला नाही, त्याला यायला उशीर का झाला हें कळलं तेव्हा सारे मित्र आणि सर सुद्धा चकित झाले.

सर म्हणाले- ''अरे, बोलला असतास तसं, तर स्पर्धेत दोघांनाही प्रवेश मिळाला असता. आम्ही जास्तीचा वेळसुद्धा दिला असता. का असेना, मुलांनो ! समीरनं आज एवढं चांगलं काम केलंय - स्पर्धेत भाग नसतानाही त्याला मी खास बक्षीस देणार आहे. मला



आधीच रस्ता वाईट. त्यात सगळीकडे पावसानं निसरडं झालेलं. त्यामुळे पाय घसरून ढोल्या सपशेल आदळला होता. हातातलं दप्तर एकीकडे, डबा दुसरीकडे, पाण्याची बाटली घरंगळून तिसरीकडे, अन् चित्रकलेचे रंग, ब्रश, बशा - सगळीकडे विखरून पडलं होतं. सुंदर इस्त्रीचा गणवेष चिखलानं भरला होता. अन् पुस्तकाची पानं वाऱ्यावर फडफडत होती. समीरनं क्षणभर ढोल्याकडं पाहिलं अन् मनाशी म्हणाला – ''छान झालं. असंच पाहिजे ! आमच्याशी शिष्टासारखं वागताना बरं वाटतं ना ?''

समीरला वाटलं - येईल तो उठून आपला आपण. स्पर्धेची वेळ झाली आहे. तिकडं लवकर गेलं पाहिजे. एवढ्यात - आई ग ! आई आई ! असं ढोल्याचं विव्हळणं समीरनं ऐकलं. ऐकलं - अन् समीरचं पाऊल थबकलं. त्याला पुढं जाववेना. समीरनं हातातल्या घड्याळात पाहिलं - अकरा वाजले होते. तिकडे स्पर्धा सुरू झाली असेल !

पण - पण तो आता थांबला. ढोल्याच्या जवळ जाऊन म्हणाला, ''फार दुखतंय का रे ?'' ढोल्यानं कण्हतच 'हो' म्हटलं. तो चांगला

सणकून आपटला होता. पाय मुरगळला होता. नुसता ठणकत होता. अन् डोळ्यातलं पाणी तो कसंबसं आवरत होता.

समीरनं ढोल्याला आधी बसतं केलं. त्याचं सगळं सामान एकत्र केलं. त्याला पाणी प्यायला दिलं. मग ढोल्याला आधार देत हळूहळू उभं केलं. अन् त्याला घेऊन, सावकाश, थांबत थांबत तो शाळेकडे निघाला.

ज्याची मस्त जिरवायची होती. ज्याची फटफजिती करायची होती, त्या ढोल्याला समीर मदत करीत होता !

स्वतःच्या नकळत, पण मनापासून ! ते दोघं शाळेत पोचले तोवर साडेअकरा वाजून वर पाच मिनिटं झाली होती म्हणजे आता वर्गात प्रवेश नाही. स्पर्धेत भाग नाही. स्पर्धा तर बुडालीच - अन् बक्षीसही हुकलं !

स्पर्धेच्या वेळेपूर्वी दहा मिनिटं हजर राहिलं पाहिजे, आणि अकरा दहानंतर कुणालाही प्रवेश मिळणार नाही, असं सरांनी बजावून सांगितलं होतं. फार तर सव्वाअकरापर्यंत प्रवेश मिळाला असता. पण आता ? शक्यच नाही. दोघंही पायरीवर सुन्नपणे बसून राहिले.

''समीर, माझ्यामुळे तुझी स्पर्धा बुडली.'' ढोल्याला वाईट वाटलं.

''असू दे रे.'' समीरनं म्हटलं.

इकडे स्पर्धेसाठी समीर आला नाही याचं सगळ्यांनाच आश्चर्य वाटलं. तो लांब राहतो. कदाचित थोडा उशीर होईल. पण तो नक्की येईल असं मित्रांना वाटत होतं. सरांनाही तसंच वाटत होतं. पण - पण समीर आलाच नाही !

समीर का आला नाही, त्याला यायला उशीर का झाला हे कळलं तेव्हा सारे मित्र आणि सर सुद्धा चकित झाले.

सर म्हणाले- ''अरे, बोलला असतास तसं, तर स्पर्धेत दोघांनाही प्रवेश मिळाला असता. आम्ही जास्तीचा वेळसुद्धा दिला असता. का असेना, मुलांनो ! समीरनं आज एवढं चांगलं काम केलंय - स्पर्धेत भाग नसतानाही त्याला मी खास बक्षीस देणार आहे. मला

समीरचा अभिमान वाटतो ! ''थ्री चीअर्स फॉर समीर'' -

''हिप् हिप् हुर्रे ! हिप् हिप् हुर्रे ! हिप् हिप् हुर्रे !'' सगळी मुलं आनंदानं ओरडली आणि त्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. जणू आत्ताच ते खास बक्षीस मिळालंय - असा आनंद समीरला झाला.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
बा. क्र. 3090 दिनांक 9/11/98
विषय बा. वा. क्र.

BVBK-0403010




# मुलांमुलींची आवडती प्रकाशने

- ❁ बहुरंगी मुखपृष्ठ
- ❁ मोठा जाड टाईप
- ❁ पशुपक्षी
- ❁ परी
- ❁ खूप चित्रे
- ❁ साधे सोपे दर्जेदार लेखन
- ❁ जादू
- ❁ राक्षस यांची जंगी फौज

मुलांना खाऊ खेळणीपेक्षा प्रिय अशा
गोष्टींची खूप पुस्तके
बुकसेलर्स व शाळा यांना भरपूर कमिशन

---

## दिलीपराज प्रकाशन प्रा.लि.


२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

---

3090

शकुंतला फडणीस

# खमंग धडा



बा. को.
3090

BVBK-0403010